# आदिवासींमध्ये हिंदू संस्कृतीचे संस्कार
## सौ. निर्मला यार्दी

''गुजराथ राज्यांतील संपूर्ण आदिवासी भागांत गेल्या दहा वर्षांत डांगमधील आदिवासींमध्ये हिंदू संस्कृतीचे संस्कार''

सह्याद्री व डांगमधील जंगलात अभूतपूर्व क्रांती होत आहे. या जंगलांतील ज्या आदिवासी समाजांत देवाला काही नावच नव्हते, तेच आदिवासी आता रामनामाचा जप करू लागले आहेत.

गुजरात राज्याच्या दक्षिणेकडील बलसाड जिल्ह्यापासून उत्तरेला साबरकांठा जिल्ह्यापर्यंत पसरलेल्या बलसाड, डांग, सुरत, भडोच, बडोदा, पंचमहाल, साबरकांठा व बनासकांठा या सात जिल्ह्यांतील डोंगराळ प्रदेशांत खूप मोठ्या प्रमाणांत आदिवासींची वस्ती आहे. इ.स. १८४४ मध्ये डांगमधील भिल्ल राजांकडून सुरतच्या ईस्ट कंपनीच्या अधिकाऱ्यांनी जंगले ताब्यात घेतली. जवळजवळ १७०८ चौरस किलोमीटर पसरलेल्या घनदाट जंगलामध्ये कितीतरी शतकांपासून आदिवासींची वस्ती आहे. १५० वर्षांपूर्वी इंग्रजांनी लाकूड मिळविण्यासाठी जंगले ताब्यात घेतली व तेव्हापासून या आदिवासी लोकांबरोबर शिक्षित समाजाचा संपर्क सुरू झाला. परंतु बलसाडपासून बनासकांठ्यापर्यंत डोंगराळ प्रदेशांत राहिलेल्या आदिवासी लोकांनी जंगलातच राहून त्यांची संस्कृती व निसर्गजीवनच पसंत केले. समाजांत अनेक परिवर्तने झाली, डांग शेजारच्या जिल्ह्यामध्ये प्रगतीची घोडदौड झाली, परंतु डांगमधील आदिवासींनी मात्र आधुनिकीकरण न स्वीकारता स्वतःच्या संस्कृतीचा अभिमान बाळगून ते निष्ठावंत राहिले.

डांगमधील आदिवासी, शेती व जंगलांत चालणाऱ्या इतर व्यवसायांवर उपजीविका करतात. डांगविषयी श्री. दत्तात्रय भास्कर चित्रे ''डांग एक सम्यक दर्शन'' या पुस्तकांत लिहितात की, डांगमधील आदिवासी हिंदू धर्माचे पालन करतात. ते हिंदू देव देवतांची पूजा करतातच त्याशिवाय बाकी स्थानिक देवता व भूत-पिशाच्च योनीविषयीही त्यांच्यामध्ये गाढ श्रद्धा आढळून येते. निर्दोष, प्रामाणिक व मागासलेल्या आदिवासींचे धर्मांतर नेहमीच ख्रिस्ती मिशनरी करीत असतात. या मागासलेल्या भागांत शिक्षण व आरोग्य ह्याविषयी काही सुधारणा करून ख्रिस्ती मिशनरी त्यांचा धर्मप्रसार करतात. डांगमध्ये जवळजवळ दीडशे वर्षांपासून चालू असलेल्या या धर्मांतर चळवळीमुळे आदिवासींमध्ये सुधारणा तर झाली नाहीच, पण ख्रिस्ती धर्माचा मात्र खूपच प्रसार झाला.

गुजराथी समाजांत बऱ्याचपैकी डांगच्या विकासाविषयी मिशनऱ्यांच्या धर्मांतर चळवळीविषयी चर्चा झाली. शेवटी सुमारे १९९० पासून नवसारी व त्यावेळच्या संयुक्त बलसाड जिल्ह्यांतील हिंदू समाजाने डांगमधील आदिवासींच्या विकासाचा निर्धार केला. नवसारीचे रमेशभाई बामरोलीया, कांतीभाई व्यास आणि गोपाळभाई पटेलांनी मुलींकरिता शाळा सुरू केल्या. त्यानंतर डांगच्या नैसर्गिक रचनेमुळे आकर्षित होऊन वनवासी कल्याण आश्रमाच्या स्वामी असीमानंदांनी डांगमधील आदिवासी लोकांमध्ये हिंदुत्वाचे संस्कार व शिक्षण याविषयी काम सुरू केले. त्यांनी आदीवासींच्या हातचे भोजन पण घेतले, ते त्यांच्याबरोबर त्यांच्या झोपडीत पण राहिले. त्यामुळे आदिवासींचा विश्वास त्यांनी संपादन केला.

असीमानंदांबरोबरच नवसारीच्या हिंदू समाजांतील रमेशभाई बामरोलिया व व्यास, पटेल वगैरे नेत्यांनी अनेक खेडेगावांत फिरून आदिवासी लोकांच्या परिस्थितीविषयी सखोल अभ्यास केला. डांगमधील आदिवासी ईश्वर व धर्म मानत, पण त्यांच्या देवाला नांव नव्हते. आजारपणांत ते भगताकडे जात असत. शेवटी अत्यंत विद्वान असलेल्या स्वामी असीमानंदांनी आदिवासींच्या मूळ संस्कृतीचे जतन करून त्यांच्यात शिक्षण व धर्माचे संस्कार करायला सुरुवात केली. डिसेंबर १९९७ मध्ये स्वामी असीमानंद व त्याच्या साथीदारांनी हिंदू समाजाचे भव्य संमेलन भरविले. त्यंत जवळजवळ २०००० लोकांची उपस्थिती होती. त्यानंतर १९९८ पासून त्यांनी ठिकठिकाणी सभा संमेलनाद्वारे हिंदू संस्कृतीच्या प्रचाराला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी शबरी माता सेवा ट्रस्टची स्थापना केली. पीलवाडापासून जवळच असलेल्या सुबीर नावाच्या गावांत त्यांनी बांबूच्या मंदिरात शबरी मातेची स्थापना केली. कारण भगवान रामचंद्रांनी वनवासांत असतांना त्याच जागी शबरी नावाच्या आदिवासी वृद्धेकडून आतिथ्य स्वीकारून बोरं खाल्ली होती.

त्यानंतर पुष्कळ कार्यक्रम आयोजित केले गेले. आदिवासींचाही प्रतिसाद मिळाला. अर्थातच ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून ह्या हिंदू धर्माच्या प्रसाराला विरोध झालाच. त्यांनी हिंदू धार्मिक सभासंमेलनात दंगल माजवली. क्वचित प्रसंगी रक्तपातही झाला. परंतु शबरी मातेचे भव्य मंदिर उभारण्याची चळवळ चालूच राहिली. सुबीर गावांतील लासूभाई गावित यांनी त्यांची अडीच एकर जमीन मंदिराकरीता दान म्हणून दिली. बऱ्याच कायदेशीर अडथळ्यांनंतर आज तिथे भव्य व रमणीय मंदिराची निर्मिती झालेली आहे.

डांगमध्ये आहवा गांवापासून जवळच असलेल्या सुबीर गावांत हे नवीनच तीर्थस्थान आहे. त्याबरोबरच शिक्षण व आरोग्याबाबतही आदिवासी लोकांमध्ये जागृती निर्माण होत आहे. डांगमधील आदिवासी आता दगडाऐवजी खऱ्या देवाची भक्ती व पूजा करतात. अशा रम्य ठिकाणी एकदातरी सर्वांनी अवश्य भेट द्यावी असेच हे ठिकाण आहे.